# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल**
**क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.८५२/२०२२/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. अनिल मांगीलाल खिंवसरा,<br>रा. फ्लॅट नं.८, जिनेंद्रपुजा अपार्टमंट, गुलमोहोरनगर, दिंडोरी रोड, म्हसरुळ,नाशिक-४, ता. जि. नाशिक. | कर निरीक्षक श्रेणी ब,<br>प्रशासकीय अधिकारी, दिंडोरी नगरपरिषद, दिंडोरी, ता. दिंडोरी, जि. नाशिक. | मुख्याधिकारी,<br>दिंडोरी नगरपरिषद, दिंडोरी, ता. दिंडोरी , जि. नाशिक. |

**सुनावणी दिनांक — ०८/०७/२०२४**

**१. उपस्थिती —**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| उपस्थित | उपस्थित | उपस्थित | उपस्थित | उपस्थित |

**२. द्वितीय अपील अर्ज —**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : ०७/०२/२०२२

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाची सुनावणी घेतली नाही तसेच निकाल दिला नाही. व जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व दिशाभुल करणारी माहिती दिली.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : संबंधितावर शास्ती व शिस्तभंग कारवाई प्रस्तावित करण्यात यावी. व नुकसान भरपाई देणेबाबत आदेश व्हावा.

**३. माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ०६/०९/२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०७/०९/२०२१

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : आजमितीस.

**(४ ) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :**
नगरपंचायत हद्दीतील आठवडे बाजारच्या जागेचे किती क्षेत्र नगरपंचायतीचे ताब्यात आहे. तसेच या क्षेत्राचा भूमापन क्रमांक कोणता आहे याबाबत माहिती मिळावी.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही** : अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. ०४/१०/२०२१ चे पत्रान्वये कार्यालयातील उपलब्ध माहिती पुरविण्यात आलेली आहे.

**४. प्रथम अपील -**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : २१/१०/२०२१

(२) प्रथम अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २१/१०/२०२१

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : जन माहिती अधिकारी यांनी मी मागितलेली माहिती न देता चुकीची तसेच दिशाभूल करणारी माहिती दिली आहे.

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**
कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

५. **युक्तिवाद/लेखी खुलासा —** सुनावणीवेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केले की, अपिलार्थी यांना दि. ०४/१०/२०२१ अन्वये उपलब्ध माहिती पुरविली आहे. त्यामध्ये अपिलार्थीनी मागणी केल्यानुसार बजार क्षेत्राचा व भूमापन क्रमांकाचा उल्लेख आहे.

६. **निष्कर्ष —**

- अपिलार्थीने केलेल्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येते.
- तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, दिंडोरी नगरपरिषद, दिंडोरी, ता. दिंडोरी, जि. नाशिक यांनी प्रथम अपिलीय अर्जावर सुनावणी घेऊन आदेश पारीत केल्याचे दिसून येते नाही.
- जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये बाहार क्षेत्र व भूमापन क्रमांक यांचा उल्लेख असून जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती योग्य असल्याचे दिसून येते.
- अपिलार्थी यांना कोणती माहिती चुकीची व दिशाभुल करणारी मिळाली याबाबत सुनावणीवेळी काहीही सांगता आले नाही.

सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपिल क्रमांक. ८५२/२०२२/नाशिक निकाली काढण्यात येत आहे

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

जावक क्र. 2५८६

07 APR 2025